
छकुल्या
...मुकलेल्या!
०-६ वर्षे वयाचे बालिका-बालक प्रमाण (१९९१-२००१-२००९) महाराष्ट्र
राज्य आरोग्य यंत्रणा संसाधन केंद्र, पुणे.

**सध्याच्या आधुनिक जगात, समान हक्कांच्या युगात, मुलांचा हव्यास इतका पराकोटीला जातो की मुलीचा जन्माला येण्याचा हक्कच हिरावून घेतला जातो.
या वेड्या हव्यासाच्या विपरित परिणतीचे हे चित्रांकन !**



- भारतात गर्भलिंग निदान केल्यामुळे दर वर्षी अंदाजे **एक लाखाहून अधिक गर्भपात होत आहेत.**

  **– अरनॉल्ड, किशोर आणि रॉय (२००२)**

---

- ''रूढी (मुलांचा हव्यास) व आधुनिक तंत्रज्ञान (सोनोग्राफी) यांमधील घातक हातमिळवणीने (Unholy alliance) भारतीय समाजात गहजब माजवला आहे.

  **– डॉ. आशिष बोस**

---

- ०–६ वर्षे वयाचे बालक बालिकांचे बिघडलेले संतुलन नीट करणे कठीण आहे आणि त्याचे दुष्परिणाम आपल्याला खूप काळापर्यंत भोवणार आहेत.

  **– जे. के. बांठीया**

  भारताचे **महानिबंधक व जनगणना आयुक्त २००१**

---

- भारतात दरवर्षी सुमारे ५ लाख मुली जन्माला येण्यापूर्वीच जीवनाला मुकतात.

  **– प्रभात झा, राजेशकुमार इ.**

  द लॅन्सेट, ९ जानेवारी २००६

# छकुल्या ...मुकलेल्या!

## ०-६ वर्षे वयाच्या बालिका-बालकांचे प्रमाण

(१९९१-२००१-२००९)

# महाराष्ट्र राज्यातील तालुकानिहाय स्थित्यंतर

संयुक्त राष्ट्र जनसंख्या कोष यांच्या आर्थिक सहाय्याने प्रसिध्द.

पुर्नमुद्रित - द्वितीय आवृत्तीतील आकडेवारीमधील चुकांच्या दुरुस्तीसह

# ०–६ वर्षे वयाच्या बालिका–बालकांचे प्रमाण

(१९९१–२००१–२००९)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०–६ वर्षे वयाच्या बालिका–बालकांचे प्रमाण | = | ०–६ वर्षे वयातील बालिकांची संख्या / ०–६ वर्षे वयातील बालकांची संख्या | X | १००० |



**नवी दिल्ली येथे २८ एप्रिल २००८ रोजी संपन्न ''कन्या वाचवा'' या राष्ट्रीय अभियानांतर्गत आयोजित राष्ट्रीय सभेच्या उद्घाटन प्रसंगी मा. पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या भाषणातील सारांश...**

आपले राष्ट्र हे एक प्राचिन संस्कृती असणारे आणि स्वत:ला आधुनिक म्हणवून घेणारे आहे. तरीही आपण, सामाजिक संभ्रमामुळे लिंगभेदाच्या असंतुलनात जगत आहोत. आर्थिक समृध्दी आणि शैक्षणिक उत्कर्ष होत असताना देखील जनगणनेनुसार स्त्री-पुरुष प्रमाणतेची आकडेवारी मात्र सुधारणा दर्शवित नाही असे विचार मा. पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांनी ''कन्या वाचवा'' या विषयावर आयोजित केलेल्या उद्घाटन प्रसंगी व्यक्त केले.

सामाजिक जागरुकता आणि गर्भलिंग निदान प्रतिबंध कायद्याच्या कडक अंमलबजावणीने आपण स्त्री-पुरुषांच्या असमानतेच्या संकटावर मात करु शकतो.

सन २००१ च्या जनगणने नुसार स्त्री-पुरुष गुणोत्तर घसरले असल्याचे स्पष्ट होत आहे आणि ही एक अतिशय लाजीरवाणी बाब आहे.

पुरुषप्रधान संस्कृतीतील वेगवेगळ्या चालीरीतीमुळे मुली व स्त्रीयांना दुय्यम स्थान दिले गेले आहे आणि हे आव्हान निश्चितपणे आपण पेलले पाहिजे आणि आरोग्य विभागाने लाखोंच्या संख्येने निवडून येणाऱ्या या शहरी लोकप्रतिनिधींना पुर्वाभिमुख करुन या समस्येशी लढा देण्यासाठी जागरुक करणे गरजेचे आहे याकरिता स्त्री-शिक्षण हे केंद्रस्थानी ठेवले पाहिजे ज्यामुळे जनसामान्यात या प्रतिकुल स्त्री-पुरुष प्रमाणास आव्हान देता येईल.

पंतप्रधानांनी मुलींच्या कमी होत असलेल्या प्रमाणास तोंड देण्यासाठी वेगवेगळ्या सामाजिक संस्था/ कार्यकारिणीला मदत देण्यावर भर दिला आहे.

मुलींच्या समाजातील असंतुलीत प्रमाण परिस्थिती संपवण्याकरीता वेगवेगळे धर्मगुरु आणि सामाजिक नेत्यांचा सहभाग घेणे गरजेचे वाटते व या करिता त्यांचा सहभाग घेण्यात यावा. प्रतिकुल अशा स्त्री-पुरुष प्रमाणतेच्या सुधारणेसाठी केल्या जाणाऱ्या कोणत्याही कार्यवाहीसाठी भारत सरकार बांधील राहिल याबाबत त्यांनी ग्वाही दिली.

# प्रास्ताविक

आधुनिक जगात वावरत असताना देखील मुलाच्या हव्यासाचा विपरीत परिणाम मुलांमधील लिंग गुणोत्तर प्रमाणावर होत असल्याचे चित्रांकन **'छकुल्या... मुकलेल्या'** पुस्तिकेच्या प्रथम आवृत्ती मध्ये केले गेले होते.

याच पार्श्वभूमीवर त्याच प्रमाणाची सद्यस्थिती जून २००९ च्या आकडेवारीनुसार दुसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने आपल्या समोर मांडण्यात येते आहे. जनगणना २००१ ची आकडेवारी ८ वर्षे जूनी झाली आहे. तसेच २०११ ची आकडेवारी प्राप्त होण्यास अजूनही ३ ते ४ वर्षे लागतील. कायद्याच्या अंमलबजावणीच्या परिणामी सद्यस्थितीच्या उत्सुकतेचे निरसन करण्यासाठी द्वितीय आवृत्तीचा खटाटोप केलेला आहे. वाचकांना अद्ययावत आकडेवारीची माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी अंगणवाडीतील ० ते ६ वयोगटातील मुलामुलींच्या आकडेवारीचा उपयोग केला गेला आहे. राज्यातील सर्व अंगणवाडीमध्ये नोंदलेल्या ८३.४ लक्ष मुलांच्या माहितीवर आधारित हे ३४ जिल्ह्यातील (बृहन्मुंबई एकत्रीत) तालुकानिहाय लिंग गुणोत्तर प्रमाण संकलित करण्यात आले आहे. जनगणना व अंगणवाडीतील आकडेवारीच्या फरकाचे कारण मुख्यत्वे एकात्मिक बाल विकास योजनेमध्ये महानगरातील झोपडपट्टी व्यतिरिक्त भागाच्या माहितीचा अभाव हे आहे.

द्वितीय आवृत्ती काढण्यासाठी श्रीमती वंदना कृष्णा, आयुक्त, कुटुंब कल्याण, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी प्रेरणा दिली. तसेच कु. अश्विनी देवणे यांचा द्वितीय आवृत्तीच्या आकडेवारीच्या संकलनामध्ये मोलाचा वाटा आहे.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व संशोधन मंडळ, बालभारती पुणे, यांनी प्रथम आवृत्ती प्रमाणेच दुसऱ्या आवृत्ती करीता देखील अद्ययावत तालुक्याच्या सीमेचे नकाशे पुरवल्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे.

**डॉ. प्र.प्र. डोके**
कार्यकारी संचालक
राज्य आरोग्य यंत्रणा संसाधन केंद्र,
महाराष्ट्र, पुणे.

लोकसंख्येतील

स्त्री–पुरुष प्रमाण

भारत व महाराष्ट्र १९०१ –२००१

(जनगणना)






०–६ वर्षे वयाचे

बालिका–बालक प्रमाण

भारत १९६१–२००१ व महाराष्ट्र १९७१–२००१

(जनगणना)



# ०-६ वर्षे वयाच्या बालिका-बालकांचे प्रमाण

## भारत

### १९९१



देशाचे प्रमाण : ९४५

### २००१



मॅपिंग द अॅडव्हर्स चाइल्ड सेक्स रेशो इन इंडिया (जून २००३)

देशाचे प्रमाण : ९२७



**बालकांमधील स्त्री-पुरुष प्रमाण**



- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक





# ०–६ वर्षे वयाच्या बालिका–बालकांचे प्रमाण

# महाराष्ट्र जिल्हा

## १९९१




- राज्याच्या मधल्या भागातील १५ जिल्ह्यांमध्ये हे प्रमाण इतर भागाच्या मानाने कमी आहे (९५० पेक्षा कमी)
- राज्याच्या पश्चिमेकडील कोकण किनारपट्टी, नाशिक व नंदुरबार जिल्ह्यात स्त्री–पुरुष प्रमाण चांगले आहे.
- राज्याच्या पूर्वेकडील जिल्ह्यांमध्येसुद्धा स्त्री–पुरुष प्रमाण ९५० हून जास्त आहे.
- गडचिरोली या आदिवासी जिल्ह्याचे प्रमाण सर्वात जास्त आहे (९८०)

**राज्याचे प्रमाण : ९४६**

## २००१




- फक्त पाच जिल्ह्यांचे स्त्री–पुरुष प्रमाण ९५० पेक्षा जास्त आहे
- जळगाव पासून कोल्हापूर पर्यंतच्या मधल्या पट्ट्यातील ९ जिल्ह्यांमध्ये हे प्रमाण वेगाने कमी झाले असून ९०० पेक्षा कमी झाले आहे. कोल्हापूर या प्रगत जिल्ह्यात हे प्रमाण सर्वात कमी ८३९ आहे तर इतरत्र ते ८५० ते ९०० च्या दरम्यान आहे.

**राज्याचे प्रमाण : ९१३**

## २००९




- एकुण ३४ पैकी फक्त पाच आदिवासी जिल्ह्यांचे प्रमाण ९५० किंवा अधिक आहे.
- ठाणे जिल्ह्याचे प्रमाण सर्वाधिक म्हणजे ९६२ इतके तर बीड जिल्ह्याचे प्रमाण सर्वात कमी ८४८ इतके आहे.
- तसेच १४ जिल्ह्यांचे प्रमाण ९०० ते ९५० दरम्यान व १३ जिल्ह्यांचे प्रमाण ८५० ते ९०० दरम्यान आहे.

**राज्याचे प्रमाण : ९०८**



| बालकांमधील स्त्री–पुरुष प्रमाण |
|---|
| ८०० पेक्षा कमी |
| ८०० ते ८४९ |
| ८५० ते ८९९ |
| ९०० ते ९४९ |
| ९५० व त्यापेक्षा अधिक |



## ०–६ वर्षे वयाच्या बालिका–बालकांचे प्रमाण

# महाराष्ट्र तालुके

१९९१



२००१



२००९





**बालकांमधील स्त्री–पुरुष प्रमाण**

| रंग | प्रमाण |
|---|---|
| लाल | ८०० पेक्षा कमी |
| नारिंगी | ८०० ते ८४९ |
| पिवळा | ८५० ते ८९९ |
| फिकट हिरवा | ९०० ते ९४९ |
| हिरवा | ९५० व त्यापेक्षा अधिक |



## ०–६ वर्षे वयाच्या बालिका–बालकांचे प्रमाण

# मुंबई उपनगरे व मुंबई जिल्हा

### १९९१




### २००१




### २००९






| बालकांमधील स्त्री–पुरुष प्रमाण |
|---|
| ८०० पेक्षा कमी |
| ८०० ते ८४९ |
| ८५० ते ८९९ |
| ९०० ते ९४९ |
| ९५० व त्यापेक्षा अधिक |





# ०–६ वर्षे वयाच्या बालिका–बालकांचे प्रमाण

# रायगड जिल्हा

## १९९१




- रायगडमधील एकूण तालुक्यांपैकी एकही तालुका ९३५ च्या खाली नाही.
- वस्तुत: फक्त ३ तालुके वगळता इतर १२ तालुक्यातील स्त्री–पुरूष प्रमाण ९५० पेक्षा जास्त आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९६१**

## २००१




- या वर्षी ह्या तालुक्यामध्ये १९९१ च्या उलट स्थिती असून फक्त ४ तालुक्यातील स्त्री–पुरूष प्रमाण ९५० पेक्षा जास्त आहे.
- पुणे–मुंबई महामार्गाजवळील व अलिबाग जवळील तालुक्यात हे प्रमाण कमी झालेले दिसते.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९३९**

## २००९




- उरण तालुक्यात ५० अंकांनी लक्षणीय घट झाली आहे.
- अलिबाग, सुधागड–पाली, माणगाव, महाड, पोलादपूर, म्हसळा, श्रीवर्धन या तालुक्यांत लक्षणीय वाढ झाली आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९३७**



| बालकांमधील स्त्री–पुरूष प्रमाण |
|---|
| ८०० पेक्षा कमी |
| ८०० ते ८४९ |
| ८५० ते ८९९ |
| ९०० ते ९४९ |
| ९५० व त्यापेक्षा अधिक |





## ०-६ वर्षे वयाच्या बालिका-बालकांचे प्रमाण

# रत्नागिरी जिल्हा

### १९९१




- सर्वच ९ तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे व ७ तालुक्यात हे प्रमाण ९५० पेक्षा जास्त आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९६१**

### २००१




- लांजा, गुहागर व संगमेश्वर तालुक्यातील प्रमाण वाढून ते ९५० पेक्षा जास्त झाले असले तरी ९ पैकी ४ तालुक्यातील प्रमाण ९५० पेक्षा कमी झाले आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९५२**

### २००९




- चिपळूण तालुक्याच्या प्रमाणात वाढ झाली असून प्रमाण ९५० पेक्षा अधिक झाले आहे.
- उर्वरित सर्वच तालुक्यांच्या प्रमाणात घट झालेली आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९४२**



| बालकांमधील स्त्री-पुरुष प्रमाण | |
|---|---|
| (लाल) | ८०० पेक्षा कमी |
| (नारिंगी) | ८०० ते ८४९ |
| (पिवळा) | ८५० ते ८९९ |
| (फिकट हिरवा) | ९०० ते ९४९ |
| (हिरवा) | ९५० व त्यापेक्षा अधिक |





# ०–६ वर्षे वयाच्या बालिका–बालकांचे प्रमाण

# ठाणे जिल्हा

## १९९१




- सर्वच १५ तालुक्यात हे प्रमाण ९५० पेक्षा जास्त आहे.
- शहरी भाग जास्त असलेल्या ६ तालुक्यातील स्त्री–पुरुष प्रमाण ९५० पेक्षा कमी आहे.

**जिल्हाचे प्रमाण : ९५२**

## २००१




- दहा वर्षात या ६ तालुक्यात एकाची भर पडून ७ तालुक्यातील प्रमाण ९५० पेक्षा कमी झाले आहे. ठाणे व जवळील परिसरातच हा बदल झाला आहे.
- आदिवासी तालुक्यात हे प्रमाण ९५० पेक्षा जास्त आहे.
- उल्हासनगरचे प्रमाण ९०० पेक्षा कमी आहे.

**जिल्हाचे प्रमाण : ९३१**

## २००९




- सर्वच तालुक्यातील प्रमाण ९०० पेक्षा अधिक आहे.
- १५ पैकी १२ तालुक्यातील प्रमाण ९५० पेक्षा अधिक आहे.
- उल्हासनगरचे प्रमाण ५८ अंकानी वाढलेले आहे.

**जिल्हाचे प्रमाण : ९६२**



| बालकांमधील स्त्री–पुरुष प्रमाण |
| --- |
| ८०० पेक्षा कमी |
| ८०० ते ८४९ |
| ८५० ते ८९९ |
| ९०० ते ९४९ |
| ९५० व त्यापेक्षा अधिक |





## ०–६ वर्षे वयाच्या बालिका–बालकांचे प्रमाण

# अहमदनगर जिल्हा

### १९९१




- सर्वच १४ तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- जिल्ह्याच्या उत्तर व दक्षिणेतील मिळून ७ तालुक्यातील स्त्री–पुरुष प्रमाण ९५० पेक्षा कमी आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९४९**

### २००१




- दहा वर्षात स्त्री–पुरूष प्रमाणात झपाट्याने घट झालेली दिसून येते व फक्त एका आदिवासी तालुक्यातील स्त्री–पुरूष प्रमाण ९५० पेक्षा जास्त राहिलेले दिसून येते.
- उर्वरित १३ तालुक्यात हे प्रमाण ९०० कमी झाले असून ८६० पर्यंत घसरले आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ८८४**

### २००९




- अहमदनगर जिल्ह्यामध्ये १३ तालुक्यांत घट दिसून येते, तर अहमदनगर तालुक्यात वाढ झालेली आहे.
- सन २००१ च्या तुलनेत गेल्या ९ वर्षात बालिकांच्या प्रमाणात ३२ अंकांनी घट झालेली आहे.
- सर्वच तालुक्यांमध्ये हे प्रमाण ९०० पेक्षा कमी असून पैकी ९ तालुक्यांमध्ये ८०० ते ८५० पर्यंत आहे ही चिंताजनक बाब आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ८५२**



| बालकांमधील स्त्री–पुरूष प्रमाण |
|---|
| ८०० पेक्षा कमी |
| ८०० ते ८४९ |
| ८५० ते ८९९ |
| ९०० ते ९४९ |
| ९५० व त्यापेक्षा अधिक |



# ०–६ वर्षे वयाच्या बालिका–बालकांचे प्रमाण

# धुळे जिल्हा

## १९९१




- चारही तालुक्यात हे प्रमाण ९०० च्या वर असून साक्री व शिरपूर तालुक्यात ते ९५० पेक्षा जास्त आहे

**जिल्ह्याचे प्रमाण : ९४७**

## २००१




- चारही तालुक्यात प्रमाण घटले आहे.
- धुळे तालुक्यात ते ९०० पेक्षाही कमी झाले आहे तर, इतर तीन तालुक्यात ते ९५० पेक्षाही कमी झाले आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९०७**

## २००९




- फक्त मुख्यालयाच्या धुळे तालुक्यात ३१ आणि साक्रीत ४ अंकांनी प्रगती झाली असून उर्वरीत शिरपूर व सिंदखेडा तालुक्यात २००१ च्या तुलनेत अल्पशी घट झालेली आहे

**जिल्ह्याचे प्रमाण : ९१७**



| बालकांमधील स्त्री–पुरुष प्रमाण |
|---|
| ८०० पेक्षा कमी |
| ८०० ते ८४९ |
| ८५० ते ८९९ |
| ९०० ते ९४९ |
| ९५० व त्यापेक्षा अधिक |





# ०–६ वर्षे वयाच्या बालिका–बालकांचे प्रमाण

# जळगाव जिल्हा

## १९९१




- १५ पैकी १४ तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- पारोळा तालुक्यातील प्रमाण हे राज्यातील सर्वात कमी प्रमाण आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९२५**

## २००१




- सर्वच १५ तालुक्यात स्त्री–पुरुष प्रमाणात लक्षणीय घट झाली असून पुर्वीच्या पारोळा तालुक्याच्या जोडीला इतर ११ तालुक्यांचे प्रमाणही ८६५ ते ९०० च्या दरम्यान झाले आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ८८०**

## २००९




- अंमळनेर या तालुक्यातील प्रमाणात १८ अंकांनी वाढ झालेली आहे.
- इतर सर्व तालुक्यातील प्रमाणात लक्षणीय घट झालेली आढळते.
- पाचोरा तालुक्यातील प्रमाणात ५२ अंकांनी घट झालेली आढळते.

**जिल्ह्याचे प्रमाण : ८५७**



| बालकांमधील स्त्री–पुरुष प्रमाण |
|---|
| ८०० पेक्षा कमी |
| ८०० ते ८४९ |
| ८५० ते ८९९ |
| ९०० ते ९४९ |
| ९५० व त्यापेक्षा अधिक |





# ०–६ वर्षे वयाच्या बालिका–बालकांचे प्रमाण

# नाशिक जिल्हा

## १९९१




- सर्वच १५ तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- ९५० पेक्षा जास्त प्रमाण असणारे १० तालुके आहेत तर ५ तालुक्यात हे प्रमाण ९०० ते ९५० च्या दरम्यान आहे.

**जिल्हाचे प्रमाण : ९५४**

## २००१




- ९५० पेक्षा कमी प्रमाण असणाऱ्या तालुक्यांच्या संख्येत ५ वरून १० पर्यंत वाढ झाली आहे.
- नाशिक व निफाड तालुक्यात हे प्रमाण ८८८ झाले आहे.

**जिल्हाचे प्रमाण : ९२०**

## २००९




- सन २००१ वर्षा बरोबर तुलना केली असता एकंदर प्रमाण ९२० वरच स्थिर राहिल्याचे दिसत असले तरी एकूण १० तालुक्यांमध्ये २००१ च्या तुलनेत घट दिसून येते.
- नाशिक व मालेगांव तालुक्यांत बऱ्यापैकी वाढ झालेली असून नांदगांव, त्र्यंबकेश्वर व पेठ या ३ तालुक्यांत अल्पशी वाढ झालेली आहे.

**जिल्हाचे प्रमाण : ९२०**



| बालकांमधील स्त्री–पुरुष प्रमाण |
| --- |
| ८०० पेक्षा कमी |
| ८०० ते ८४९ |
| ८५० ते ८९९ |
| ९०० ते ९४९ |
| ९५० व त्यापेक्षा अधिक |



# ०–६ वर्षे वयाच्या बालिका–बालकांचे प्रमाण

# नंदूरबार जिल्हा

## १९९१




- सर्वच ६ तालुक्यात हे प्रमाण ९५० पेक्षा जास्त आहे. हे सर्व आदिवासी तालुके आहेत.
- अक्कलकुवा व आक्रणी या २ तालुक्यात प्रमाण १००० पेक्षा जास्त आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९७७**

## २००१




- सन १९९१ साली सर्वच तालुक्यातील बालिकांचे प्रमाण ९५० ते १०३२ च्या टप्प्यात होते ते २००१ साली फक्त ४ तालुक्यामध्ये (आक्राणी, नवापूर, तळोदा व अक्कलकुवा) ९५० ते ९९५ टप्प्यात आले आहे.
- सन १९९१ साली सर्वच तालुक्यामध्ये हे प्रमाण ९५० च्या वर होते. २००१ साली शहादा आणि नंदुरबार तालुक्यात हे प्रमाण ९५० च्या खाली घसरले आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९६१**

## २००९




- या आदिवासी जिल्ह्यातील फक्त मुख्यालयाचा नंदूरबार तालूका वगळता बाकी सर्व तालुक्यातील ६ वर्षाखालील बालिकांचे प्रमाणात २००१ च्या तुलनेत घट झालेली दिसून येते.
- अक्कलकुवा तालुक्यात ३९ अंकांनी घट झालेली आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९५१**



| बालकांमधील स्त्री–पुरुष प्रमाण |
|---|
| ८०० पेक्षा कमी |
| ८०० ते ८४९ |
| ८५० ते ८९९ |
| ९०० ते ९४९ |
| ९५० व त्यापेक्षा अधिक |





## ०–६ वर्षे वयाच्या बालिका–बालकांचे प्रमाण

# पुणे जिल्हा

## १९९१




- सर्वच १४ तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- पश्चिमेकडील ४ तालुके व पुरंदर मध्ये हे प्रमाण ९५० पेक्षा जास्त आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९४३**

## २००१




- पुणे जिल्ह्याच्या पूर्व भागातील ६ तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा (अपवाद पुणे शहर–९०९) कमी झाले आहे.
- पश्चिम भागातील ७ तालुक्यात ते ९०० ते ९५० दरम्यान आहे. स्पष्टपणे जिल्ह्याचे दोन भाग पडल्यासारखे दिसत आहेत

**जिल्ह्याचे प्रमाण : ९०२**

## २००९




- पुणे शहर, वेल्हे व पुरंदर तालुका वगळता उर्वरीत अकराही तालुक्यांमध्ये बालिकांच्या प्रमाणात अल्पशी घट झाल्याचे दिसून येते.
- सन २००१ साली बालिकांचे प्रमाण ८५० ते ९०० चे दरम्यान असलेल्या ७ तालुक्यात भर पडून २००९ साली ८५० ते ९०० च्या टप्प्यात एकूण १४ पैकी ९ तालुके आहेत, तर शिरुर तालुक्याचे प्रमाण ८५० च्या खाली आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ८९५**



| बालकांमधील स्त्री–पुरुष प्रमाण | |
|---|---|
| लाल | ८०० पेक्षा कमी |
| नारिंगी | ८०० ते ८४९ |
| पिवळा | ८५० ते ८९९ |
| फिकट हिरवा | ९०० ते ९४९ |
| हिरवा | ९५० व त्यापेक्षा अधिक |





## ०–६ वर्षे वयाच्या बालिका–बालकांचे प्रमाण

# सोलापूर जिल्हा

## १९९१




- सर्वच ११ तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- दक्षिण सोलापूर तालुक्यात स्त्री–पुरुष प्रमाण ९५० पेक्षा जास्त आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९३५**

## २००१




- फक्त तीनच तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- ९०० पेक्षा कमी प्रमाण असलेल्या उर्वरित ८ पैकी बार्शी तालुक्यात हे प्रमाण ८४५ पर्यंत घसरले आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ८९५**

## २००९




- बार्शी तालुक्यातील प्रमाणात ६५ अंकांची लक्षणीय वाढ झाली असून उत्तर सोलापूर तालुक्यातील प्रमाणात ३९ अंकांनी वाढ झालेली आढळते.
- अक्कलकोट, बार्शी, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर वगळता सर्व तालुक्यांच्या प्रमाणात ९०० पेक्षा कमी आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ८९७**



| बालकांमधील स्त्री–पुरुष प्रमाण |
| --- |
| ८०० पेक्षा कमी |
| ८०० ते ८४९ |
| ८५० ते ८९९ |
| ९०० ते ९४९ |
| ९५० व त्यापेक्षा अधिक |





# ० – ६ वर्षे वयाच्या बालिका–बालकांचे प्रमाण

# सातारा जिल्हा

## १९९१




- सातारा जिल्ह्यातील ११ तालुक्यांपैकी, ८ तालुक्यात हे प्रमाण ९०० ते ९५० दरम्यान आहे. तर महाबळेश्वर मध्ये हे प्रमाण ८८० आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९४१**

## २००१




- महाबळेश्वर तालुक्यातील प्रमाणात ९३१ पर्यंत वाढ झाली असली तरी ११ पैकी ६ तालुक्यात हे प्रमाण ८५० ते ९०० मध्ये आले आहे.
- विकसित कराड तालुक्यात हे प्रमाण चिंताजनक पातळीपर्यंत (८४८ पर्यंत) घसरले आहे.

महाराष्ट्र राज्यात सर्वात जास्त वाढ झालेला तालुका महाबळेश्वर – ५१ अंक

**जिल्ह्याचे प्रमाण : ८७८**

## २००९




- कराड तालुक्यातील ६ वर्षाखालील बालिकांच्या प्रमाणात वाढ झालेली आहे.
- महाबळेश्वर तालुक्यात १९९१ ते २००१ या दशकामध्ये बालिकेंच्या संख्येत झालेली वाढ पुढील ९ वर्षात तशीच न राहता ३६ अंकांनी घट होऊन हे प्रमाण ८९५ इतके खाली आले आहे. उलटपक्षी सधन कराड तालुक्यात बालिकांच्या प्रमाणात वाढ झाली आहे.
- जावळी, पाटण आणि सातारा या ३ तालुक्यांमध्ये बालिकांचे प्रमाण ९०० ते ९५० च्या दरम्यान आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ८९६**



| बालकांमधील स्त्री–पुरुष प्रमाण |
|---|
| ८०० पेक्षा कमी |
| ८०० ते ८४९ |
| ८५० ते ८९९ |
| ९०० ते ९४९ |
| ९५० व त्यापेक्षा अधिक |



# ०-६ वर्षे वयाच्या बालिका-बालकांचे प्रमाण

# कोल्हापूर जिल्हा

## १९९१




- सर्वच तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- पैकी ५ तालुक्यात ९५० पेक्षा जास्त आहे.

## २००१




- पश्चिम महाराष्ट्रातील प्रगत अशा कोल्हापूर जिल्ह्यातील सर्वच तालुक्यातील प्रमाणात चिंताजनक घट झालेली आहे.
- राज्यात १९९१ च्या तुलनेत १०० अंकाहून जास्त घट असलेले ९ तालुके आहेत. त्यातील सर्वात जास्त म्हणजे ४ तालुके (पन्हाळा, कागल, राधानगरी व करवीर) या जिल्ह्यातील आहेत.

**राज्यात सर्वात कमी प्रमाण तालुका-पन्हाळा-७९५**
**राज्यात सर्वात जास्त घट झालेला तालुका पन्हाळा - १३६ अंक**

## २००९




- १२ पैकी ५ तालुक्यांच्या प्रमाणात घट झाली असून, इतर ७ तालुक्यांच्या प्रमाणात वाढ झालेली दिसून येते.
- गगनबावडा तालुक्याचे प्रमाण ९०० पेक्षा जास्त असून इतर सर्व तालुक्यांचे प्रमाण ९०० पेक्षा कमी आहे.
- पन्हाळा तालुक्याच्या प्रमाणात ७९५ वरुन ८१९ इतकी वाढ झाली आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९३१**

**जिल्ह्याचे प्रमाण : ८३९**

**जिल्ह्याचे प्रमाण : ८५४**



| बालकांमधील स्त्री-पुरुष प्रमाण |
|---|
| ८०० पेक्षा कमी |
| ८०० ते ८४९ |
| ८५० ते ८९९ |
| ९०० ते ९४९ |
| ९५० व त्यापेक्षा अधिक |





# ०–६ वर्षे वयाच्या बालिका–बालकांचे प्रमाण

# सांगली जिल्हा

## १९९१




- सर्वच तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- ९ तालुक्यांपैकी आटपाडी या एकाच तालुक्यातील स्त्री–पुरुष प्रमाण ९५० पेक्षा जास्त तर इतर ८ तालुक्यात ते ९०० ते ९५० च्या दरम्यान आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९२४**

## २००१




- ९ पैकी ८ तालुक्यात हे प्रमाण ८०० ते ९०० या दरम्यान आले आहे.
- वाळवा तालुक्यात हे प्रमाण ८०६ पर्यंत घसरले आहे.
- साखर उत्पादक विभागात हे प्रमाण भयावह रीतीने कमी झाले आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ८५१**

## २००९




- ९ पैकी ५ तालुक्यांचे प्रमाण ८५० ते ९०० च्या दरम्यान आहे
- वाळवा तालुक्यातील प्रमाण हे ७९९ पर्यंत घसरलेले आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ८६८**



| बालकांमधील स्त्री–पुरुष प्रमाण |
|---|
| ८०० पेक्षा कमी |
| ८०० ते ८४९ |
| ८५० ते ८९९ |
| ९०० ते ९४९ |
| ९५० व त्यापेक्षा अधिक |



# ०–६ वर्षे वयाच्या बालिका–बालकांचे प्रमाण

# सिंधुदुर्ग जिल्हा

## १९९१




- सर्वच ८ तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- वैभववाडी तालुक्यात हे प्रमाण १०३० इतके आहे.
- मध्य भागातील ५ तालुक्यात ९५० पेक्षा जास्त असून दक्षिणेकडील २ तालुक्यांत ते ९०० ते ९५० दरम्यान आहे.

**जिल्हाचे प्रमाण : ९६३**

## २००१




- वेंगुर्ला तालुक्यातील प्रमाण ९३४ वरून ९८४ पर्यंत वाढले आहे.
- इतरपैकी ५ तालुक्यात ते ९०० ते ९५० च्या दरम्यान असून उत्तर भागातील दोनच तालुक्यात ते ९५० पेक्षा जास्त आहे.

**हेच खरे वैभव !**
**राज्यात सर्वात जास्त प्रमाण तालुका वैभववाडी – १०१५**

**जिल्हाचे प्रमाण : ९४४**

## २००९




- मालवण तालुक्यातील प्रमाण ९३५ वरुन ९५१ इतके वाढलेले आहे.
- इतर सर्व तालुक्यांचे प्रमाण घटले आहे.
- मालवण, वेंगुर्ला, वैभववाडी व सावंतवाडी या तालुक्यांतील प्रमाण ९५० पेक्षा जास्त आहे व इतर ४ तालुक्यांतील प्रमाण हे ९५० पेक्षा कमी आहे.

**जिल्हाचे प्रमाण : ९२६**



| बालकांमधील स्त्री–पुरुष प्रमाण |
| --- |
| ८०० पेक्षा कमी |
| ८०० ते ८४९ |
| ८५० ते ८९९ |
| ९०० ते ९४९ |
| ९५० व त्यापेक्षा अधिक |



# ०–६ वर्षे वयाच्या बालिका–बालकांचे प्रमाण

# औरंगाबाद जिल्हा

## १९९१




- औरंगाबाद मधल्या पट्ट्यातील ५ तालुक्यात हे प्रमाण ९०० ते ९५० च्या दरम्यान आहे. तर औरंगाबाद तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा कमी आहे

**जिल्ह्याचे प्रमाण : ९३३**

## २००१




- पैठण व सिल्लोड तालुके वगळता इतर तालुक्यात हे प्रमाण कमी होऊन ८५० ते ९०० या टप्प्यात गेले आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ८९०**

## २००९




- सन २००१ च्या तुलनेत औरंगाबाद, फुलंबी, गंगापूर, सोयगांव या ४ तालुक्यात बालिकांच्या प्रमाणात थोडीशी वाढ तर पैठण, खुलताबाद, सिल्लोड या तालुक्यात थोडीशी घट झालेली असून, मात्र कन्नड व वैजापूर या तालुक्यातील परिस्थिती तशीच राहिली आहे.
- सर्वच तालुक्यात हे प्रमाण ८५० ते ९०० याच टप्प्यात राहिलेले आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ८८८**



| बालकांमधील स्त्री–पुरुष प्रमाण |
|---|
| ८०० पेक्षा कमी |
| ८०० ते ८४९ |
| ८५० ते ८९९ |
| ९०० ते ९४९ |
| ९५० व त्यापेक्षा अधिक |



## ०–६ वर्षे वयाच्या बालिका–बालकांचे प्रमाण

# जालना जिल्हा

### १९९१




- सर्वच तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- ८ पैकी ४ तालुक्यात ९५० पेक्षा जास्त प्रमाण आहे व ४ तालुक्यात ९०० ते ९५० च्या दरम्यान आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९५१**

### २००१




- जिल्ह्याच्या पश्चिमेकडील ४ तालुक्यांत हे प्रमाण कमी होऊन ८५०–९०० या दरम्यान आहे. तर पुर्वेकडील चार जिल्ह्यांत ९०० पेक्षा जास्त आहे. परंतू ९५० पेक्षा कमी आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९०३**

### २००९




- अंबड आणि घनसावंगी तालुके वगळता उर्वरीत ६ तालुक्यांमध्ये २००१ च्या तुलनेत २००९ साली बालिकांचे प्रमाण कमी झालेले आहे.
- घनसावंगी वगळता सर्वच तालुक्यांमध्ये २००९ साली बालिकांचे प्रमाण ८५० ते ९०० च्या दरम्यान आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ८९६**



| बालकांमधील स्त्री–पुरुष प्रमाण |
|---|
| ८०० पेक्षा कमी |
| ८०० ते ८४९ |
| ८५० ते ८९९ |
| ९०० ते ९४९ |
| ९५० व त्यापेक्षा अधिक |





# ०–६ वर्षे वयाच्या बालिका–बालकांचे प्रमाण

# परभणी जिल्हा

## १९९१




- सर्वच तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- ९ तालुक्यांपैकी ५ तालुक्यात ते ९०० ते ९५० च्या दरम्यान प्रमाण आहे. इतरत्र ते ९५० पेक्षा जास्त आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९५६**

## २००१




- सोनपेठ वगळता इतर सर्व तालुक्यात या प्रमाणात घट होऊन सर्वांचे प्रमाण ९०० ते ९५० च्या दरम्यान झाले आहे.
- सोनपेठ तालुक्यात या प्रमाणात वाढ झालेली आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९२३**

## २००९




- परभणी वगळता इतर सर्व तालुक्याच्या प्रमाणात घट झालेली आढळते.
- मानवत तालुक्याच्या प्रमाणात ४९ अंकानी घट झाली असून सोनपेठ तालुक्याच्या प्रमाणात ३७ अंकाची घट झालेली आढळते.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९१२**



| बालकांमधील स्त्री–पुरुष प्रमाण | |
|---|---|
| (लाल) | ८०० पेक्षा कमी |
| (नारिंगी) | ८०० ते ८४९ |
| (पिवळा) | ८५० ते ८९९ |
| (फिकट हिरवा) | ९०० ते ९४९ |
| (हिरवा) | ९५० व त्यापेक्षा अधिक |





## ०–६ वर्षे वयाच्या बालिका–बालकांचे प्रमाण

# हिंगोली जिल्हा

### १९९१




- सर्वच तालुक्यात हे प्रमाण ९५० ते १००० च्या दरम्यान आहे.

**जिल्हाचे प्रमाण : ९५३**

### २००१




- कळमनूरी तालुका वगळता इतर (३) तालुक्यांत हे प्रमाण कमी झाले असून ९०० ते ९५० च्या दरम्यान आहे तर सेनगांव मध्ये हे प्रमाण ९०० पेक्षा कमी झाले आहे.

**जिल्हाचे प्रमाण : ९२७**

### २००९




- सन २००१ च्या तुलनेत सर्वच तालुक्यामधील बालिकांचे प्रमाण कमी झालेले आहे.
- सन २००१ च्या तुलनेत २००९ साली दर १००० बालकांमागे बालिकांच्या संख्येत २९ ने घट झालेली आहे.
- हिंगोली, कळमनुरी, सेनगांव या तालुक्यांमध्ये बालिकांचे प्रमाण ८५० ते ९०० इतके आहे.

**जिल्हाचे प्रमाण : ८९८**



| बालकांमधील स्त्री–पुरुष प्रमाण |
| --- |
| ८०० पेक्षा कमी |
| ८०० ते ८४९ |
| ८५० ते ८९९ |
| ९०० ते ९४९ |
| ९५० व त्यापेक्षा अधिक |





# ०-६ वर्षे वयाच्या बालिका-बालकांचे प्रमाण

# बीड जिल्हा

## १९९१




- सर्वच ११ तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- जिल्ह्याच्या ७ तालुक्यांमध्ये हे प्रमाण ९०० ते ९५० च्या दरम्यान असून उर्वरित ४ तालुक्यांत ९५० पेक्षा जास्त आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९३९**

## २००१




- दक्षिणेकडील ६ तालुक्यांत स्त्री-पुरूष प्रमाण ९०० पेक्षा कमी झाले आहे. इतर तालुक्यांत ते ९०० ते ९५० च्या दरम्यान आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ८९४**

## २००९




- सन २००१ च्या तुलनेत २००९ साली बालिकांच्या प्रमाणात ४६ अंकांनी घट झालेली असून ६ तालुक्यांमध्ये हे प्रमाण ८०० ते ८५० या टप्प्यात आहे.
- शिरुर कासार तसेच धारूर तालुक्यात बालिकांच्या प्रमाणात अनुक्रमे ८५ व ९१ अंकांनी झालेली घट चिंताजनक आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ८४८**



| बालकांमधील स्त्री-पुरूष प्रमाण | |
|---|---|
| (लाल) | ८०० पेक्षा कमी |
| (नारिंगी) | ८०० ते ८४९ |
| (पिवळा) | ८५० ते ८९९ |
| (फिकट हिरवा) | ९०० ते ९४९ |
| (हिरवा) | ९५० व त्यापेक्षा अधिक |



# ०-६ वर्षे वयाच्या बालिका-बालकांचे प्रमाण

# नांदेड जिल्हा

## १९९१




- सर्वच १६ तालुक्यात हे प्रमाण ९५० पेक्षा जास्त आहे.
- भोकर, माहूर व बिलोली या तालुक्यांत हे प्रमाण ९५० पेक्षा कमी असून इतर सर्व तालुक्यात ९५० पेक्षा जास्त आहे.

## २००१




- हे चित्र एकदम उलट झाले असून फक्त किनवट व धर्माबाद तालुक्यांत हे प्रमाण ९५० पेक्षा जास्त आहे व इतर १४ तालुक्यात हे प्रमाण ९५० पेक्षा कमी झाले आहे.

## २००९




- १६ पैकी १० तालुक्यांच्या प्रमाणात वाढ झाली असून, किनवट तालुक्याने १०००चा टप्पा पार केला आहे तेथे ६३ अंकांची वाढ झालेली आहे .
- भोकर, नायगाव व नांदेड वगळता सर्वच तालुक्यांचे प्रमाण ९०० पेक्षा अधिक आहे.
- देगलूर, मुखेड, धर्माबाद व किनवट तालुक्यांचे प्रमाण ९५० किंवा अधिक आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९६०**

**जिल्ह्याचे प्रमाण : ९२९**

**जिल्ह्याचे प्रमाण : ९२४**



| बालकांमधील स्त्री-पुरुष प्रमाण |
|---|
| ८०० पेक्षा कमी |
| ८०० ते ८४९ |
| ८५० ते ८९९ |
| ९०० ते ९४९ |
| ९५० व त्यापेक्षा अधिक |





# ०–६ वर्षे वयाच्या बालिका–बालकांचे प्रमाण

# लातूर जिल्हा

## १९९१




- सर्वच १० तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- जिल्ह्याच्या पुर्वेकडील ४ तालुक्यात व रेणापूर तालुक्यात हे प्रमाण ९५० पेक्षा जास्त असून इतर ५ तालुक्यात ९०० ते ९५० दरम्यान आहे.

**जिल्हाचे प्रमाण : ९४७**

## २००१




- मुख्यालयाच्या लातूर तालुक्यात हे प्रमाण कमी झाले असून ९०० पेक्षा कमी आहे.
- इतर सर्व तालुक्यात हे प्रमाण ९०० ते ९५० दरम्यान आहे.

**जिल्हाचे प्रमाण : ९१८**

## २००९




- उदगीर, चाकूर व लातूर तालुक्यामध्ये अल्पशी वाढ वगळता बाकी सर्व तालुक्यांत २००१ च्या तुलनेत घट झालेली आहे.
- औसा व रेणापूर तालुक्यातील प्रमाण ८५० ते ९०० च्या दरम्यान कमी झालेले आहे.
- इतर सर्व तालुक्यात हे प्रमाण ९०० ते ९५० दरम्यान आहे.

**जिल्हाचे प्रमाण : ९०८**



| बालकांमधील स्त्री–पुरुष प्रमाण |
| --- |
| ८०० पेक्षा कमी |
| ८०० ते ८४९ |
| ८५० ते ८९९ |
| ९०० ते ९४९ |
| ९५० व त्यापेक्षा अधिक |



## ०-६ वर्षे वयाच्या बालिका-बालकांचे प्रमाण

# उस्मानाबाद जिल्हा

## १९९१




- सर्वच ८ तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- जिल्ह्याच्या भूम, लोहारा, उस्मानाबाद व उमरगा तालुक्यात हे प्रमाण ९५० पेक्षा कमी आहे. इतर तालुक्यात ९५० पेक्षा जास्त आहे

**जिल्ह्याचे प्रमाण : ९४७**

## २००१




- उत्तरेकडील ५ तालुक्यांमध्ये या प्रमाणात बरीच घट झाली असून प्रमाण ९०० पेक्षा कमी झाले आहे. तर उमरगा, लोहारा व तुळजापूर तालुक्यात हे प्रमाण ९०० ते ९५० च्या दरम्यान आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ८९४**

## २००९




- उमरगा तालुका वगळता उर्वरीत ७ ही तालुक्यात बालिकांच्या प्रमाणात घट झालेली आहे.
- ८ पैकी ४ तालुक्यात हे प्रमाण ८०० ते ८५० च्या दरम्यान आहे.
- लोहारा, उस्मानाबाद आणि तुळजापूर या तालुक्यात हे प्रमाण ८५० ते ९०० या टप्प्यात आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ८७४**



| बालकांमधील स्त्री-पुरुष प्रमाण |
|---|
| ८०० पेक्षा कमी |
| ८०० ते ८४९ |
| ८५० ते ८९९ |
| ९०० ते ९४९ |
| ९५० व त्यापेक्षा अधिक |





## ०-६ वर्षे वयाच्या बालिका-बालकांचे प्रमाण

# अकोला जिल्हा

## १९९१




- सर्वच तालुक्यात हे प्रमाण ९००ते ९५० च्या दरम्यान आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९२९**

## २००१




- पातूर तालुक्यात हे प्रमाण ९२७ वरून ९५७ पर्यंत वाढले आहे.
- इतर तालुक्यात दोन्ही जनगणनेमध्ये विशेष फरक पडलेला नाही.

एकमेव जिल्हा
बालिका-बालक प्रमाणात १९९१ च्या तुलनेत वाढ.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९३३**

## २००९




- सन १९९१, २००१, २००९ च्या परिस्थितीमध्ये फारसा बदल दिसून येत नाही.
- सन १९९१ पासून बालिकांचे प्रमाण ९५० ते १००० या टप्प्यात असलेल्या एकमेव पातूर तालुक्यामध्ये २००९ साली घट होऊन तो ९०० च्या खाली सरकत आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९२८**



| बालकांमधील स्त्री-पुरुष प्रमाण |
| --- |
| ८०० पेक्षा कमी |
| ८०० ते ८४९ |
| ८५० ते ८९९ |
| ९०० ते ९४९ |
| ९५० व त्यापेक्षा अधिक |





## ०-६ वर्षे वयाच्या बालिका-बालकांचे प्रमाण

# अमरावती जिल्हा

## १९९१




- सर्वच तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- जिल्ह्याच्या पूर्व भागातील तिवसा तालुका व पश्चिमेकडील सात तालूक्यात हे प्रमाण ९५० पेक्षा जास्त आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण :९५०**

## २००१




- सर्वच तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- ९५० पेक्षा जास्त प्रमाण असणारे तीनच तालुके असून उर्वरित ११ तालुक्यात हे प्रमाण ९५० पेक्षा कमी आहे.

**दोन्ही जनगणनेत प्रमाण स्थिर असलेला तालुका - चिखलदरा ९६८**

**जिल्ह्याचे प्रमाण :९४१**

## २०११




- ९५० पेक्षा जास्त प्रमाण असणारे ८ तालुके आहेत. अचलपूर तालुक्यातील प्रमाणात ८९ अंकांनी व धामणगांवच्या प्रमाणात २९ अंकानी घट झालेली दिसून येते.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९२८**



| बालकांमधील स्त्री-पुरुष प्रमाण | |
|---|---|
| (लाल) | ८०० पेक्षा कमी |
| (नारिंगी) | ८०० ते ८४९ |
| (पिवळा) | ८५० ते ८९९ |
| (फिकट हिरवा) | ९०० ते ९४९ |
| (हिरवा) | ९५० व त्यापेक्षा अधिक |



### ०-६ वर्षे वयाच्या बालिका-बालकांचे प्रमाण

# बुलढाणा जिल्हा

## १९९१




- सर्वच तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- जिल्ह्याच्या उत्तर बाजूकडील २ व मध्य भागातील २ तालुक्यात हे प्रमाण ९५० पेक्षा जास्त आहे.

**जिल्हाचे प्रमाण : ९४५**

## २००१




- जिल्ह्याच्या उत्तरेकडील एकाच तालुक्यात हे प्रमाण ९५० असून दक्षिणेकडील ३ तालुक्यात हे प्रमाण ८५० ते ९०० दरम्यान घसरले आहे. इतरत्र हे प्रमाण ९०० ते ९५० दरम्यान आहे.

**जिल्हाचे प्रमाण : ९०८**

## २००९




- संग्रामपूर वगळता सर्वच तालुक्यातील प्रमाणात घट झालेली दिसून येते.
- १३ पैकी ४ तालुक्यांचे प्रमाण ९०० च्या वर आहे.
- देऊळगाव राजा, चिखली, बुलढाणा, लोणार, सिंदखेड राजा तालुक्यातील प्रमाण ८०० ते ८५० दरम्यान घसरले आहे.

**जिल्हाचे प्रमाण : ८६७**



| बालकांमधील स्त्री-पुरुष प्रमाण |
|---|
| ८०० पेक्षा कमी |
| ८०० ते ८४९ |
| ८५० ते ८९९ |
| ९०० ते ९४९ |
| ९५० व त्यापेक्षा अधिक |





# ०–६ वर्षे वयाच्या बालिका–बालकांचे प्रमाण

# यवतमाळ जिल्हा

## १९९१




- सर्वच तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- जिल्ह्याच्या पूर्वेकडील व पश्चिमेकडील जिल्ह्यात हे प्रमाण ९५० पेक्षा जास्त आहे.
- मध्यभागातील तालुक्यात हे प्रमाण ९०० ते ९५० दरम्यान आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९६१**

## २००१




- सर्वच तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- महागांव व घाटंजी तालुक्यात ह्या प्रमाणात वाढ झाली आहे.

**दोन्ही जनगणनेत प्रमाण स्थिर असलेला तालुका राळेगाव – ९४४**

**जिल्ह्याचे प्रमाण : ९३३**

## २००९




- **झरी जामणीत लक्षणीय १५८ अंकांनी वाढ झाली असून तालुका राज्यात अग्रेसर आहे.**
- केळापूर तालुक्याच्या प्रमाणात १४६ इतकी लक्षणीय घट झाली असून इतर सर्व तालुक्यांचे प्रमाण ९०० पेक्षा अधिक आहे.
- मारेगांव तालुक्यातील प्रमाणात ४० अंकांनी वाढ झाली असून तेथील प्रमाण ९५० पेक्षा जास्त आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९४१**



| बालकांमधील स्त्री–पुरुष प्रमाण |
| --- |
| ८०० पेक्षा कमी |
| ८०० ते ८४९ |
| ८५० ते ८९९ |
| ९०० ते ९४९ |
| ९५० व त्यापेक्षा अधिक |



# ०–६ वर्षे वयाच्या बालिका–बालकांचे प्रमाण

# वाशिम जिल्हा

## १९९१




- सर्वच तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- मंगरूळपीर या एकाच तालूक्यात हे प्रमाण ९५० पेक्षा जास्त आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९४१**

## २००१




- कारंजा या वंजारी वस्ती असलेल्या एकाच तालुक्यात हे प्रमाण ९२६ वरून ९५२ वर गेले आहे.
- उर्वरित ५ तालुक्यात घट झाली असून २ तालुक्यात तर ते ९०० पेक्षा कमी झाले आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९१८**

## २००९




- सर्वच ६ तालुक्यामध्ये २००१ च्या तुलनेत बालिकांचे प्रमाण कमी झाले असून २००१ च्या तुलनेत ४३ अंकांनी घट झालेली आहे.
- रिसोड तालुक्यातील बालिकांचे प्रमाण सर्वात कमी (८२९) झालेले आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ८७५**



| बालकांमधील स्त्री–पुरुष प्रमाण |
|---|
| ८०० पेक्षा कमी |
| ८०० ते ८४९ |
| ८५० ते ८९९ |
| ९०० ते ९४९ |
| ९५० व त्यापेक्षा अधिक |





# ०-६ वर्षे वयाच्या बालिका-बालकांचे प्रमाण

# भंडारा जिल्हा

## १९९१




- सर्वच तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- तालुका लाखनी वगळता इतर ६ तालुक्यात हे प्रमाण ९५० पेक्षा जास्त आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९६४**

## २००१




- सर्वच तालुक्यात स्त्री- पुरूष प्रमाणात थोडी घट झाली असली तरी जिल्ह्याचे चित्र बरेचसे पुर्वीप्रमाणेच असून ६ तालुक्यात हे प्रमाण ९५० पेक्षा जास्त आहे.
- लाखनी तालुक्यात स्त्री-पुरूष प्रमाणात २८ ने वाढ झाली असून साकोली मध्ये ३२ ने घट झाली आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९५६**

## २००९




- सर्व तालुक्यांचे प्रमाण ९०० पेक्षा अधिक असून तुमसर, लाखनी तालुक्यातील प्रमाण ९५० पेक्षा जास्त आहे.
- पवनी तालुक्यातील प्रमाण हे ३३ अंकांनी घसरलेले आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९४८**



| बालकांमधील स्त्री-पुरूष प्रमाण |
| --- |
| ८०० पेक्षा कमी |
| ८०० ते ८४९ |
| ८५० ते ८९९ |
| ९०० ते ९४९ |
| ९५० व त्यापेक्षा अधिक |





## ०–६ वर्षे वयाच्या बालिका–बालकांचे प्रमाण

# चंद्रपूर जिल्हा

## १९९१




- सर्वच तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- नागभीड, चंद्रपूर व वरोरा हे तालुके वगळता इतर अकरा तालूक्यात हे प्रमाण ९५० पेक्षा जास्त आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९६५**

## २००१




- दक्षिणेकडील ३ तालुके, कोरपना, बल्लारपूर, पोंभूर्णा व चंद्रपूर तालुक्यात हे प्रमाण ९५० पेक्षा कमी आहे.
- मुख्यालयाच्या तालुक्यात ह्या प्रमाणात ९४८ वरून ८९९ पर्यंत तीव्र घट झाली आहे.
- नागभीड व सिंदेवाही या तालुक्यात ह्या प्रमाणात वाढ झाली आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९३९**

## २००९




- सन २००१ च्या तुलनेत ९ तालुक्यांमध्ये बालिकांच्या प्रमाणात थोडीशी वाढ झालेली असून सर्व तालुक्यांची मजल ९०० ते १००० या टप्प्यांपर्यंत गेलेली आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९५०**



| बालकांमधील स्त्री–पुरुष प्रमाण |
|---|
| ८०० पेक्षा कमी |
| ८०० ते ८४९ |
| ८५० ते ८९९ |
| ९०० ते ९४९ |
| ९५० व त्यापेक्षा अधिक |



## ०-६ वर्षे वयाच्या बालिका-बालकांचे प्रमाण

# गडचिरोली जिल्हा

### १९९१




- हा पूर्ण आदिवासी जिल्हा आहे.
- १० तालुक्यात हे प्रमाण ९५० पेक्षा जास्त आहे. कोरची व अहेरी तालुक्यात हे प्रमाण अनुक्रमे १०८१ व १००१ आहे.

**राज्यात सर्वात जास्त प्रमाण तालुका कोरची-१०८१**

**जिल्ह्याचे प्रमाण : ९८०**

### २००१




- कोरची तालुक्यातील प्रमाणात १२८ अंकांनी घट झाली आहे.
- देसाईगंज वगळता सर्वच तालुक्यात हे प्रमाण ९५० पेक्षा जास्त राहीले आहे.

**१९९१ व २००१ च्या जनगणनेत प्रमाण स्थिर असलेला तालुका देसाईगंज-९४३**

**जिल्ह्याचे प्रमाण : ९६६**

### २००९




- भामरागड व कोरची तालुक्यांचे प्रमाण अनुक्रमे १०१९ व १०२३ झाले आहे. ही वाढ लक्षणीय आहे.
- सर्वच तालुक्याचे प्रमाण ९०० पेक्षा अधिक असून १२ पैकी ८ तालुक्यांचे प्रमाण ९५० पेक्षा अधिक आहे.
- मुलचेरा तालुक्यातील प्रमाणात ५७ अंकांनी घट झाली आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९६३**



| बालकांमधील स्त्री-पुरुष प्रमाण |
|---|
| ८०० पेक्षा कमी |
| ८०० ते ८४९ |
| ८५० ते ८९९ |
| ९०० ते ९४९ |
| ९५० व त्यापेक्षा अधिक |





# ०–६ वर्षे वयाच्या बालिका–बालकांचे प्रमाण

# नागपूर जिल्हा

## १९९१




- सर्वच तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे. एकूण १४ पैकी ९ तालुक्यात हे प्रमाण ९५० पेक्षा जास्त आहे.

**जिल्हाचे प्रमाण : ९५१**

## २००१




- १९९१ पेक्षा उलट प्रकारचे चित्र दिसत असून ५ तालुक्यांत हे प्रमाण ९५० पेक्षा जास्त राहीले आहे. तर ९ तालुक्यांत हे प्रमाण ९३० ते ९५० दरम्यान आहे.
- नागपूर या एकाच जिल्ह्यामध्ये नरखेड, काटोल, रामटेक, कुही, नागपूर ग्रामीण व भिवापूर या ६ तालुक्यांतील प्रमाणात वाढ झालेली आहे.

**जिल्हाचे प्रमाण : ९४२**

## २००९




- १४ पैकी ५ तालुक्यांच्या प्रमाणात वाढ झालेली असून उर्वरीत सर्व तालुक्यात लक्षणीय घट झालेली आढळून येते.
- रामटेक तालुक्यात ८८ अंकांची घसरण झालेली असून ती ९९७ वरुन ९०९ इतक्यावर आलेली आहे.
- कळमेश्वर वगळता सर्व तालुक्यांचे प्रमाण ९०० पेक्षा अधिक आहे.

**जिल्हाचे प्रमाण : ९३८**



| बालकांमधील स्त्री–पुरुष प्रमाण |
|---|
| ८०० पेक्षा कमी |
| ८०० ते ८४९ |
| ८५० ते ८९९ |
| ९०० ते ९४९ |
| ९५० व त्यापेक्षा अधिक |





# ०–६ वर्षे वयाच्या बालिका–बालकांचे प्रमाण

# वर्धा जिल्हा

## १९९१




- सर्वच तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- ५ तालुक्यात ९५० पेक्षा जास्त आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९५२**

## २००१




- सर्वच तालुक्यात हे प्रमाण ९०० ते ९५० या दरम्यान आहे.
- समुद्रपूर तालुक्याच्या प्रमाणात ५५ ने घट झाली असून ९६४ वरून ते २००१ मध्ये ९०९ झाले आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९२८**

## २००९




- ३ तालुक्यातील प्रमाण ९५० पेक्षा अधिक आहे.
- इतर सर्व तालुक्यांतील प्रमाण ९०० ते ९५० या दरम्यान आहे.
- समुद्रपूर तालुक्याच्या प्रमाणात ६९ अंकाने वाढ झाली आहे.

८ तालुक्यांपैकी २ तालुक्यांच्या प्रमाणात घट झाली असून उर्वरीत ६ तालुक्यांच्या प्रमाणात वाढ झाली आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९३८**



| बालकांमधील स्त्री–पुरुष प्रमाण |
| --- |
| ८०० पेक्षा कमी |
| ८०० ते ८४९ |
| ८५० ते ८९९ |
| ९०० ते ९४९ |
| ९५० व त्यापेक्षा अधिक |



## ०–६ वर्षे वयाच्या बालिका–बालकांचे प्रमाण

# गोंदिया जिल्हा

## १९९१




- सर्वच ८ तालुक्यात हे प्रमाण ९५० पेक्षा जास्त आहे.
- गोरेगाव व देवरी तालुक्यात हे प्रमाण १००० हून जास्त आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९७८**

## २००१




- अर्जुनी मोरगाव वगळता इतर तालुक्यात स्त्री पुरुष प्रमाणात थोडी घट झालेली असली तरी हे प्रमाण ६ तालुक्यांत ९५० पेक्षा जास्त आहे.
- गोरेगाव व तिरोडा या बिगर आदिवासी तालुक्यात तीव्र घट झाली.

गडचिरोली, नंदुरबार, यवतमाळ, गोंदिया व ठाणे या आदिवासी जिल्ह्यांमधील प्रत्येकी दोन तालुके १९९१ मध्ये बालिका बालक प्रमाण १००० पेक्षा जास्त असलेले होते परंतू २००१ मध्ये यापैकी एकाही तालुक्यात हे प्रमाण १००० वर राहिलेले नाही.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९५८**

## २००९




- सन २००९ मध्ये लिंग गुणोत्तराचे प्रमाण कमी अधिक फरकाने २००१ इतकेच राहिले आहे.
- उलटपक्षी २००९ साली सालेकसा, सडक अर्जुनी, अर्जुनी मोरगांव या आदिवासी तालुक्यांमध्ये ६ वर्षांखालील बालिकांचे प्रमाण २००१ च्या तुलनेने कमी झालेले आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९५९**



| बालकांमधील स्त्री–पुरुष प्रमाण |
| --- |
| ८०० पेक्षा कमी |
| ८०० ते ८४९ |
| ८५० ते ८९९ |
| ९०० ते ९४९ |
| ९५० व त्यापेक्षा अधिक |



## ०–६ वर्षे वयाच्या बालिका–बालकांचे प्रमाण १९९१ व २००१ मधील फरक




| बालकांमधील स्त्री–पुरुष प्रमाण १९९१ व २००१ मधील फरक |
|---|
| १०० व त्यापेक्षा अधिक घट |
| ७५ ते ९९ घट |
| ५० ते ७४ घट |
| ३१ ते ४९ घट |
| ३० पेक्षा कमी घट |
| प्रमाण स्थिर किंवा वाढ |

## ०–६ वर्षे वयाच्या बालिका–बालकांच्या प्रमाणातील (१९९१–२००१) फरकानुसार तालुक्यांचे विभाजन



| | |
|---|---|
| प्रमाण घटले (५० ते ९९ अंकांनी) तालुके ८१ | २३% |
| प्रमाण घटले (१०० व जास्त अंकांनी) तालुके ९ | २% |
| प्रमाण वाढले तालुके ३८ | ११% |
| प्रमाण स्थिर राहिले तालुके ३ | १% |
| प्रमाण घटले (१ ते ३० अंकांनी) तालुके १२६ | ३६% |
| प्रमाण घटले (३० ते ३९ अंकांनी) तालुके ५९ | १७% |
| प्रमाण घटले (४० ते ४९ अंकांनी) तालुके ३७ | १०% |

मुलापेक्षा मुलगी बरी, प्रकाश देते दोन्ही घरी.

## महाराष्ट्राचे २००१ च्या जनगणनेतील (०-६) वर्षे वयाच्या बालकांचे प्रमाण ९१३ आहे.

| | राज्य | २००१ च्या जनगणनेतील (०-६ वर्षे) बालिका-बालक प्रमाण |
|---|---|---|
| महाराष्ट्रापेक्षा जास्त प्रमाण असणारी राज्ये | आंध्रप्रदेश | ९६१ |
| | कर्नाटक | ९४६ |
| | तामिळनाडू | ९४२ |
| | केरळ | ९६० |
| | **महाराष्ट्र** | **९१३** |
| महाराष्ट्रापेक्षा कमी प्रमाण असणारी राज्ये | गुजरात | ८८३ |
| | हरियाणा | ८१९ |
| | राजस्थान | ९०९ |
| | पंजाब | ७९८ |
| **भारत** | | **९२७** |

# जन्माचे लिंग-गुणोत्तर

## Sex Ratio at Birth



मुलगी झाली म्हणून बाळगू नका भिती, मुलगी ही देखील देशाची संपत्ती.

# जन्माचे लिंग गुणोत्तर–
# निवडक राज्यांची त्रिवर्षीय सरासरी

| | राज्य | १९९८– २००० | १९९९– २००१ | २०००– २००२ | २००२– २००४ | २००३– २००५ | २००४– २००६ | २००५– २००७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| महाराष्ट्रापेक्षा जास्त गुणोत्तर असणारी राज्ये | आंध्रप्रदेश | ९६० | ९३४ | ९४५ | ९१६ | ९१७ | ९१७ | ९१५ |
| | कर्नाटक | ९४२ | ९३५ | ९५२ | ९४६ | ९४३ | ९५५ | ९४४ |
| | तामिळनाडू | ९३१ | ९२६ | ९२६ | ८८९ | ९१२ | ९२२ | ९५८ |
| | केरळ | ९३० | ९२७ | ९११ | ९२३ | ९१५ | ९१७ | ९२६ |
| | **महाराष्ट्र** | **९१३** | **९१५** | **८९९** | **८७८** | **८७२** | **८७९** | **८७१** |
| | **भारत** | ८९८ | ८९४ | ८९२ | ८८२ | ८८० | ८९२ | ९०१ |
| महाराष्ट्रापेक्षा कमी गुणोत्तर असणारी राज्ये | गुजरात | ८५१ | ८३७ | ८४४ | ८५५ | ८४४ | ८६५ | ८९१ * |
| | हरियाणा | ७९७ | ८०३ | ८०४ | ८२१ | ८२९ | ८३७ | ८४३ |
| | राजस्थान | ८७७ | ८८५ | ८९० | ८३८ | ८३९ | ८५५ | ८६५ |
| | पंजाब | ७९२ | ७७५ | ७७५ | ७९७ | ८०१ | ८०८ | ८३७ |

* २००५–२००७ मध्ये गुजरात राज्यात थोड्या प्रमाणात सुधारणा दिसते.

## आधार – नमुना नोंदणी पध्दती




## जन्माचे लिंग–गुणोत्तर महाराष्ट्र १९९१ ते २००४ (नागरी नोंदणी योजना)




## जन्माचे लिंग–गुणोत्तर महानगरपालिका (२२) २००० ते २००७ (नागरी नोंदणी योजना)




**जन्मांचे बिघडलेले लिंग गुणोत्तर वर्ष २००१ नंतर सुधारते आहे.**

# इकडे आड तिकडे विहीर

पुणे परिसरातील ग्रामीण भागातील जेमतेम सातवी ते आठवी पर्यंत शिकलेली लता.

दररोज कष्ट करुन उपजीविका.

एकापाठोपाठ चार मुली.

चौथ्या वेळी मुलगा हवा म्हणून टेस्ट केली परंतु मुलगी असल्याचे समजले.

आईच्या अंतर्मनाने गर्भपातास नकार दिला. गर्भपात ही बाब पटली नाही. अखेर मुलीला जन्म दिला. सासुबाई रागावलेल्या !

लताचा मानसिक दबाव वाढलेला. सासूच्या आग्रहास्तव शेवटी पाचव्या वेळी लता गरोदर राहिली.

सासून यावेळी सज्जड दम भरलाय ‘‘यावेळी मुलगा झाला नाहीतर तुझ्या मुली आणि तुला घराबाहेर काढीन.’’

**अशा वेळी लताने काय करावे ?**

**– अंजली राडकर**
गर्भपातावरील अभ्यास पाहणी (२००२)



# मुलीचा जीव आणि मुलाचा जीव वेगळा असतो काय ?

खानापूर (ग्रामीण) भागातील शोभा आणि वसंत (अनुक्रमे वय ३१ व ३६) हे २३ सदस्यांच्या संयुक्त कुटुंबातील एक जोडपे, वसंत ७ वी पास व शोभा निरक्षर, दोघेही शेतीधंद्यात, जीवननिर्वाह भाजीपाला व तांदूळ विकून मिळेल त्यावरच अवलंबून. कुटुंबात वर्तमानपत्र घेतले किंवा वाचले जात नाही. पण स्वत:चा आकाशवाणी व दूरदर्शन संच. दूरदर्शन कार्यक्रम रोज पाहायचे.

शोभाला एका पाठोपाठ ६ मुली झाल्या. पण मुलगा नाही. १८ व्या वर्षी शोभाला पहिली मुलगी झाली. अजूनही मुलांना जन्म देण्याचे काम सुरुच आहे. दोघांनाही कुटुंब नियोजनाच्या कायमस्वरुपी व तात्पुरत्या पद्धतींची माहिती आहे. परंतु वापरत नाहीत. यामागचे एकच कारण म्हणजे मुलगा हवाच!

शेवटच्या गरोदरपणाच्या वेळी कुटुंबाच्या इतर सदस्यांच्या दबावाला बळी पडून शोभाला गर्भलिंग परीक्षणास तयार होणे भाग पडले. परंतु परीक्षणापूर्वी तिने नवऱ्याला सांगितले.

‘‘... तुमच्या आग्रहामुळे मी परीक्षण करुन घेते परंतू मी माझ्या बाळाचा गर्भपात करणार नाही, जरी तो मुलीचा गर्भ असला तरी. *मुलीचा जीव अन् मुलाचा जीव वेगळा असतो काय?’’*

मुलगा होईपर्यंत ती मुलांना जन्म देण्यास तयार आहे. परंतु मुलगा हवा म्हणून ती मुलींना गर्भपाताने मारायला तयार नाही.

स्वत:च्या व घरातील इतरांच्या सुख शांतीसाठी, कुटुंबातील सदस्यांच्या दबावामुळे ती गर्भलिंग परीक्षणासाठी तयार आहे.परंतु काहीही झाले तरी ती गर्भपातास तयार नाही.

वसंतच्या मते कुटुंबाचा आकार ४ असावा. त्यात दोन मुले असावीत. शोभाच्या मते कुटुंबात जास्तीत जास्त ३ बालके असावीत, त्यापैकी एक मुलगा असावा. शोभावर असे बिंबवण्यात आले होते की, पहिले अपत्य हे मुलगाच हवा ! पहिल्या वेळी तिच्यावर तितकेसे दडपण नव्हते. परंतु नंतरच्या प्रत्येक वेळी तिला दडपणास बळी पडावे लागते. तिला लोकांच्या कानपिचक्या ऐकाव्या लागतात. वसंताला पुरुष असल्याने असे काही ऐकावे लागले नाही.

घर, शेतीकडे लक्ष देण्यासाठी व बहिणींना भाऊ हवाय म्हणून, इतक्या प्रचंड मानसिक दबावाखाली असतानाही, मुलगा हवाय म्हणून ६ मुली असतानाही मोठ्या प्रमाणावर प्रयत्न करण्यात येत होते.

यावेळी वाढत्या कुटुंबामुळे वाढणाऱ्या खर्चाचा विचार केला जात नव्हता. ग्रामीण भागात, मुलांना जन्म देण्यासाठी कुठलाही खर्च होत नाही, असाच समज होता.

‘मुलगा’ कुटुंबातील विशेष घटक असल्याने मुलाच्या जास्त खर्चाबाबत विचार कोणीही करत नाही. वसंताची आई घरातील कुटुंब प्रमुख असून ती सुनेकडे जास्त लक्ष देत नव्हती. फक्त तिच्याकडून मुलाची अपेक्षा करत होती.

मुलाखतीच्या वेळी शोभा अत्यंत थकलेली जाणवत होती. ती शांत व दबावाखाली वाटत होती. ती या विषयाबद्दल बोलण्यास लाजत होती. ती अत्यंत लहान आवाजात बोलत होती. तिच्या शब्दापेक्षा तिला होणारा त्रास तिच्या डोळ्यामधून सर्व काही सांगत होता.

**– अंजली राडकर**
पीएचडी प्रबंध १९९९

# ऋणनिर्देश

डॉ. संजीवनी मुळ्ये

डॉ. नागराजन्

डॉ. अंजली राडकर

मेधा काळे

श्री. पी. के. कुंभार

मॅपिंग द ॲडव्हर्स चाइल्ड सेक्स
रेशो इन इंडिया (जून २००३)
–भारत सरकार (आरोग्य व कु.क. मंत्रालय),

जनगणना कार्यालय
यूएनएफपीए



# गर्भजल तपासणी विषयक महत्वाच्या घटना

१९७८ – शासकीय रुग्णालयांत गर्भजल तपासणीच्या दुरुपयोगावर बंदी आणण्याबाबत केंद्र शासनाने सूचना दिल्या.

१९८८ – सामाजिक न्यायासाठी झगडणाऱ्या संघटनांच्या प्रयत्नांमुळे महाराष्ट्रात गर्भलिंग निदानावर प्रतिबंध आणण्यासाठी महाराष्ट्र प्रसूतिपूर्व गर्भलिंग निदान तंत्र नियंत्रण कायदा अस्तित्वात आला.

१९९४ – देशातील सर्व स्तरावर अंतिमत: देशात प्रसवपूर्व निदान तंत्र नियंत्रण कायदा अस्तित्वात आला.

२००३ – १९९४ च्या कायद्यात दुरुस्ती करुन गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व गर्भलिंग निदान तंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध) कायदा अस्तित्वात आला.

२००९ – राज्यात गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदान तंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध) कायदा २००३ चे उल्लंघन केल्यामुळे एकूण १२१ गुन्हे दाखल केलेले आहेत.

# अभिप्राय

भारतीय समाजातील स्त्रीच्या ढासळत्या स्थानावर प्रकाश टाकणारी आकडेवारी २००१ च्या जनगणनेने प्रदर्शित केली आहे. ०-६ वर्षे वयाच्या मुलांमधील लिंग - गुणोत्तर (दर हजारी मुलग्यांमागे असलेल्या मुलींचा आकडा) हा निर्देशांक या दृष्टीने फार महत्वाचा आहे. जन्माच्या वेळचे लिंग-गुणोत्तर आणि ६ वर्षापर्यंतच्या मुलांच्या व मुलींच्या मृत्यू दरातील फरक या दोन गोष्टींचा उपरोक्त निर्देशांकावर परिणाम दिसून येतो. जन्माच्या वेळचे लिंग - गुणोत्तर फक्त नैसर्गिक घटकांनी प्रभावित असले आणि ०-६ वर्षे वयापर्यंत मुला-मुलींच्या मृत्यू दरात फरक नसला तर उपरोक्त लिंग - गुणोत्तर ९४०-९५० या दरम्यान असायला हवे. २००१ च्या जनगणनेनुसार भारतासाठी हे गुणोत्तर ९२७ इतके आहे. देशातील काही राज्यांत हे गुणोत्तर बरेच कमी आहे. उदा. पंजाबात ते ७९३ आहे. दुर्दैवाने महाराष्ट्रातही हे गुणोत्तर ९१७ इतके कमी आहे आणि १९९१ नंतर ते २९ अंकांनी कमी झाले आहे. सारांश, ही नक्कीच चिंतेची बाब आहे.

आकडेवारी जनगणना २००१ च्या तात्पुरत्या अहवालावर (Provisional Report)आधारित आहे.

कल्याणकारी राज्याच्या भूमिकेतून महाराष्ट्र सरकारला या बाबतीत ठोस पावले उचलायला हवी आहेत. पी.एन.डी.टी. कायद्याच्या कडक अंमलबजावणी द्वारा जन्माच्या वेळचे लिंग-गुणोत्तर प्रभावित करण्याचे प्रयत्न चालू आहेतच. पण या प्रयत्नांना एक निश्चित दिशा मिळण्यासाठी महाराष्ट्रात कोणत्या प्रांतात उपरोक्त समस्या गंभीर आहे हे निश्चित करणे महत्वाचे असते. सुदैवाने २००१ च्या जनगणनेतून लिंग - गुणोत्तराची आकडेवारी तालुक्याच्या स्तरावरही मिळते. राज्य कुटुंब कल्याण संचालनालयाने ही आकडेवारी आकर्षक नकाशांच्या स्वरुपात प्रसिद्ध करुन एक बहुमोल माहिती लोकांच्या हाती ठेवली आहे. त्यांचा हा उपक्रम नक्कीच प्रशंसनीय आहे. सरकारी कृती योजनांसाठी तर ही माहिती उपयोगी पडेलच पण या क्षेत्रात संशोधन करणारांनाही तिचा उपयोग होईल.

सरकारी सूत्रांकडून अशा तऱ्हेचे उपक्रम भविष्यातही होतील ही अपेक्षा.

**- डॉ. संजीवनी मुळ्ये**
गोखले अर्थशास्त्र संस्था
पुणे - ४११ ००४.

## महाराष्ट्रातील अल्ट्रासाऊंड सोनोग्राफी सेंटर्स - अभ्यास पाहणी २००४ मधील काही निष्कर्ष :

- सोनोग्राफी केंद्राची संख्या जास्त असलेल्या जिल्ह्यांत ०-६ वर्ष वयोगटातील बालिका बालक प्रमाणातील घट जास्त.
- आर्थिक व सामाजिक दृष्ट्या सुधारलेल्या भागात बालिका व बालक प्रमाणातील घट जास्त.
- राज्यातील ७८ % सोनोग्राफी सेंटर्स ही मुंबई, पुणे, नाशिक व कोल्हापूर या पश्चिम महाराष्ट्रातील चार सुधारलेल्या विभागामधील १६ जिल्ह्यांमध्ये पसरलेली आहेत. तसेच जवळजवळ ५०% सेंटर्स ही महानगरपालिका क्षेत्रामध्ये आहेत.
- सोनोग्राफी सेंटर्सची संख्या आणि बालिका बालक प्रमाणातील घट यामध्ये 'स्टॅटिस्टिकली सिग्निफिकंट कोरिलेशन' आहे.

**- डॉ.संजीवनी मुळ्ये** आणि **डॉ. नागराजन**
गोखले इन्स्टिट्यूट, पुणे.









## कायद्याने लिंग निवडीस बंदी –

राष्ट्रीय लोकसंख्या धोरणाचा (२००२) मुख्य उद्देश लोकसंख्या नियंत्रण आहे. यामागे सर्वांगीण विकास करुन स्त्री–पुरुष प्रमाण समतोल करणे हा देखील एक उद्देश आहे.

त्याच अनुषंगाने प्रसवपूर्व निदान तंत्र (विनियमन आणि दुरुपयोग प्रतिबंध) कायद्यात २००२ मध्ये दुरुस्ती होवून हा कायदा १४ फेब्रुवारी २००३ पासून अस्तित्वात आला. प्रसवपूर्ण निदान तंत्र (विनियमन आणि दुरुपयोग प्रतिबंध) १९९४ च्या कायद्याच्या नावात बदल होवून गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदान तंत्र ( लिंग निवडीस प्रतिबंध) कायदा असे नाव देण्यात आले आहे.

या कायद्यानुसार गर्भधारणेपूर्वी किंवा गर्भधारणेनंतर लिंग निवडीस प्रतिबंध आहे. जनुकीय विकृती व गर्भातील इतर गुणसूत्र संबंधित दोष यांचे निदान करण्यासाठी अल्ट्रासाऊंड व तत्सम तंत्राचा वापर करण्यास या कायद्यात परवानगी असली तरी या कायद्यान्वये गर्भलिंग निदान तंत्रावर नियंत्रण आहे.

गर्भलिंग निदान तंत्राचा दुरुपयोग होवून, गर्भलिंग निदान करुन मुलीचा गर्भ असल्यास तो नाहीसा केला जातो. या प्रकाराला आळा बसावा व त्याद्वारे समाजातील स्त्री–पुरुष प्रमाणातील असमतोल दूर व्हावा हा या कायद्याचा मुख्य उद्देश आहे.

लिंग निवड करणाऱ्यास रुपये १०,०००/– दंड व ३ वर्षे कारावासाच्या शिक्षेची तरतूद या कायद्यात आहे. पुनरावृत्ती झाल्यास रु. ५०,०००/– पर्यंत दंड व ५ वर्षे कारावास अशी शिक्षा होवू शकते. लिंग निदानात वैद्यकीय व्यावसायिकांचा सहभाग आढळल्यास राज्य वैद्यकीय कौन्सिल संबंधित डॉक्टरांची नोंदणी स्थगित करु शकते आणि डॉक्टरास शिक्षा झाल्यास डॉक्टरांची नोंदणी कौन्सिल रद्द करु शकते.

राज्य आरोग्य यंत्रणा संसाधन केंद्र, पुणे.



Rama's Design, Pune.